# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

Email id frajalgaon@gmail.com /revjalgaon@gmail.com दूरध्वनी 0257-2220152 फॅक्स 0257-2220500

क्रं.जमीन/2/वनका/42/85/144/2020 दिनांक : 03/12/2020

प्रति,
मा.कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
(मर्यादित) मुंबई, शिबीर कार्यालय, नाशिक

**विषय** :- अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम 2006 व नियम 2008 सुधारीत नियम 2012 अंमलबजावणी अंतर्गत पहूर जामनेर बोदवड मुक्ताईनगर बऱ्हाणपूर इच्छापूर रस्त्याच्या कामासाठी प्रमाणपत्र मिळणेबाबत

**संदर्भ** :- आपले कार्यालयाचे पत्र क्र. MSRDC/NSK/NH/996/2020 Dt. 12/08/2020

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रानुसार वनहक्क कायद्यांतर्गत (FRA) प्रमाणपत्र व कमीत कमी वनक्षेत्र लागत असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Minimum Demand Area) मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.सदर प्रस्तावानुसार वर नमुद प्रमाणपत्राच्या मा. जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीच्या 5 प्रती यासोबत सहपत्रासह जोडलेल्या आहेत.

(पंकज लोखंडे)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव

# MINIMUM DEMAND OF FOREST AREA

(Certificate of Collector)

Government of Maharashtra
Office of District Collector , Jalgaon
No. FRA/42/85/RR/144/2020
Dated :- 3 /12/2020

Certified that all other alternatives for the purpose have been explored and the demand for the required forest land for Proposed " **Pahur – Jamer – Bodwad-Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L " Tal. Jamner Dist. Jalgaon** is the barest minimum demand.

The demand made by the **Executive Engineer, M.S.R.D.C (Ltd) Mumbai Camp office Nashik** for the below mentioned forestland from **Jamner** Taluka of Jalgaon District is the minimum for Proposed **"Pahur – Jamer – Bodwad- Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L" Tal. Jamner Dist. Jalgaon**

Area statement of the forestland required for Proposed **"Pahur – Jamer – Bodwad-Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L" Tal. Jamner Dist. Jalgaon.**

| Sr. No | Particular | Village | Gat No. /Compart ment. No | Length (m) | Width (m)av. | Area in Sq. M | Area in Ha. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ch.km. 20.850 to 22.790 = 1.94 Km | Sonari & Rampura | 487 | 1940 | 2.70 | 5243 | 5.243 |
| 2 | Ch.km.22.790 to 23.300 = Km | Sonari & Rampura | 483 | 510 | 2.06 | 1052 | 1.052 |
| | **Total Forest land** | | | | | | **6.295** |

COLLECTOR JALGAON

(Abhijit Raut)
**Collector Jalgaon**

FORM – I

(for plantations on non-forest land and notified as " protected forest" on or after 13th December 1930 and located in villages having no recoded Scheduled Tribe Population as per 2001 and 2011 census)

**[Rule 6(3) (e) of Forest (conservation) Rules 2003 as amended up to date]**

Government of Maharashtra
Office of District Collector , Jalgaon
No. FRA/42/85/RR/144/2020
**Dated :- 3 /12/2020**

## TO WHOMESOEVER IT MAY CONCERN

In compliance of the Rule 6(3) (e) of the Forest (Conservation) Rules, 2003 [as amended vide the Forest (Conservation) Amendment Rules 2014; Forest (Conservation) second Amendment Rules 2014; and Forest (Conservation) Amendment Rules 2016] it is certified that **6.295 hectares** of forest land proposed to be diverted in favour of **Executive Engineer, M.S.R.D.C (Ltd) Mumbai Camp office Nashik. RO Mumbai Ministry of Road Transport and Highways Government of India**. for Rehabilitation and Up-gradation of **Pahur-Jamner-Bodwad-Muktainagar –Barhanpur Road NH-753L** from **existing chainage Km.0/0 to km 45/00 and design ch. Km.0.00 to 44.760 Pkg. I to two lane** with paved shoulders on EPC mode in the state of Maharashtra (purpose for diversion of forest land) in the district falls within the jurisdication of **Jalgaon District village (s) Rampura and Sonari in Jamner Tahsils** having no recorded population of Scheduled Tribes as per Census of India 2001 and 2011. It is further certified that:

(a) The Protected Forest (s) namely **Rampura and Sonari Tehasil Jamner Jalgaon District** involved in the above villages are plantations raised on non-forest land on or after 13th December 1930 and were notified as PF vide notification no (s) …………….dated…………………….;

(b) Therefore, these PFs neither have residing Scheduled Tribes nor have Other Traditional Forest Dwellers (residing in the PFs for more than 75 years) having rights recognized under Forest Rights Act, 2006.

**Encl: As above**

COLLECTOR JALGAON

**(Abhijit Raut)**
**Collector, Jalgaon**

**FORM – II**
**(for projects linear projects other than plantation)**

**[Rule 6(3) (e) of Forest (conservation) Rules 2003 as amended up to date]**

Government of Maharashtra
Office of District Collector , Jalgaon
No. FRA/42/85/RR/ 145 /2020
**Dated :- 3 /12/2020**

## TO WHOMESOEVER IT MAY CONCERN

In compliance of the Rule 6(3) (e) of the Forest (Conservation) Rules, 2003 [as amended vide the Forest (Conservation) Amendment Rules 2014; Forest (Conservation) second Amendment Rules 2014; and Forest (Conservation) Amendment Rules 2016] it is certified that **6.295 hectares** of forest land proposed to be diverted in favour **of Executive Engineer, M.S.R.D.C (Ltd) Mumbai Camp office Nashik. RO Mumbai Ministry of Road Transport and Highways. Government of India** (name of user agency) for rehabilitation and Up gradation of **Pahur-Jamner-Bodwad-Muktainagar –Barhanpur Road NH-753L** from **existing chainage Km.0/0 to km 45/00 and design ch Km.0.00 to 44.760 Pkg. I to two lane** with paved shoulders on EPC mode in the state of Maharashtra (purpose for diversion of forest land) in the district falls within the jurisdiction of **Jalgaon District village (s) Rampura and Sonari in Jamner Tahsils.** It is further certified that:

(a) The complete process for identification and settlement of rights under the FRA has been carried out for the entire 6.295 hectares of forest land proposed for diversion. A copy of records of all consultations and meetings of the Forest Rights Committee(s), Gram Sabha(s), Sub- Division Level Committee(s) and the District Level Committee are enclosed as attachment ................to attachment.............

(b) The diversion of forest land for facilities managed by the Government as required under section 3(2) of the FRA,2006 have been completed and the Gram Sabhas have given their consent to it;

(c) The proposed area does not involve recognized right of Primitive Tribal Groups and Pre Agricultural Committees.

*Encl.; As above*

COLLECTOR JALGAON

**(Abhijit Raut)**
**Collector, Jalgaon**

# उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांचे कार्यालय,
## जिल्हाधिकारी जळगाव कार्यालय आवार,जळगाव.

ई-मेल : jalgaonsdo@gmail.com　　　　　　　　　　दुरध्वनी क्र. 0257-2220868


क्र./भूसंपादन/753L/एसआर/106/2017　　　　　　　　　　दिनांक :- 12/10/2020.

प्रति,
म. जिल्हाधिकारी, जळगाव
(महसुल शाखा)

2020/43525

| जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव: | |
|---|---|
| आवक क्र. | |
| शाखा | महसूल |
| दिनांक | 15 OCT 2020 |
| सह.सा.शा. | नि.उ.जि./उ.जि.(संदर्भ) |
| अपर जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |

विषय :- भुसंपादन प्रस्ताव क्र. 106/ 2017 मौजे पहूर-जामनेर-बोदवड-मुक्ताईनगर-इच्छापूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एल किमी ०+००० ते ४४+७६० चे पेव्हड शोल्डरसह रुंदीकरण करणे व सुधारणा करणेकामी वन जमिन वनेतर प्रयोजनाबाबत प्रस्तावासाठी (1) Minimum Demand Area प्रमाणपत्र (२) वन हक्क कायदा अंतर्गत प्रमाणपत्र प्रदान करणेविषयी.

संदर्भ :- १) कार्यकारी अभियंता म.रा.र.वि.महामंडळ (मर्या) मुंबई शिबीर कार्यालय नाशिक यांचेकडील पत्र क्र.MSRDC/NSK/NH/996/2020 दि.१२-०८-२०२० व पत्र क्र. MSRDC/NSK/NH/996A/2020 दि.१२-०८-२०२०.
(२) म. जिल्हाधिकारी जळगाव यांचे कडील पत्र क्र. जमिन/२/वनका/४२/८५/६७/२०२० दि.३१-०८-२०२०.
(३) वन संरक्षण कायदा १९८० व वन सरंक्षण नियम २००३
(४) वन उपसंरक्षक जळगाव विभाग जळगाव यांचे पत्र क्र. B/Desk-5/जमीन/1146 दि.11-08-2020

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये भुसंपादन प्रस्ताव इकडील कार्यालयात कार्यान्वीत असुन या प्रकल्पाचे लांबीपैकी सा.क्र. २०/८५० ते २३+३०० या लांबीत भारत सरकार रस्ता वाहतूक मंत्रालय (Govt. of India MoRTH) नवी दिल्ली यांनी निश्चित केलेल्या IRC:SP 73:2015 चे मार्गदर्शक तत्वानुसार रस्त्याचे वळणे व चढ उतार यांची अंमलबजावणी होणेसाठी वन जमीन वनेतर प्रयोजनार्थ वर्ग करणेचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) मुंबई यांनी वनविभागास दि.३०-०९-२००९ रोजी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला आहे व कागदपत्रांची पूर्तता केल्यावरुन उपवनसंरक्षक जळगाव विभाग जळगाव व कार्यकारी अभियंता म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) शिबीर कार्यालय नाशिक यांनी मागणी केलेल्या क्षेत्राची दि.२०-०७-२०२० रोजी संयुक्त पाहाणी केली. त्यानुसार जामनेर तालुक्यातील सोनारी व रामपूरा शिवारातील कंपाट्मेंट क्र.४८३ पैकी १.०५२ हेक्टर जमीन व कंपाट्मेंट क्र.४८७ पैकी ५.२४३ हेक्टर जमीन अशी एकूण ६.२९५ हेक्टर वनक्षेत्र वनेतर प्रयोजनार्थ वर्ग करण्यासाठी निश्चित केले. त्यावरून संदर्भ क्र. (४) व संदर्भक्र.(१) नुसार संदर्भ क्र.(३) नुसार आवश्यक प्रमाणपत्रे मिळणेकामी म. जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे विनंती केली आहे. संदर्भ पत्र क्र. (२) नुसार इकडेस तत्संबंधी चौकशी करून अहवाल सादर करणेचे आदेशावरून उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली.

(१) ग्रामपंचायत सोनारी ता. जामनेर व ग्रामपंचायत रामपूरा ता. जामनेर यांना ग्रामसभा घेवून तत्संबंधी ना हरकत प्रमाणपत्र व वनहक्क कायद्यांतर्गत प्रमाणपत्र मागवले.

155

(२ ) वन हक्क कायदा समितीची उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सभा दि.२९-०९-२०२० रोजी आयोजीत केली.

वरील मुद्याचे अनुपालन खालील प्रमाणे :-

(१) ग्रामपंचायत सोनारी ता. जामनेर यांनी दि.२७-०९-२०२० रोजी ग्रामसभा बोलावून राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक वन जमिनीमध्ये बांधकाम करणेविषयी हरकत नाही व संबंधित क्षेत्रात वनदावे दाखल नाहीत. किंवा प्रलंबित नाही असे ठराव समंत करून प्रोसेडींग सादर केले. (सोबत प्रोसीडींग सादर केले आहे)

(२) ग्रामपंचायत रामपूरा ता. जामनेर यांनी दि.१२-०९-२०२० रोजी ग्रामसभा घेवून ठराव क्र.१० अन्वये राष्ट्रीय महामार्ग वर कोणत्याही ग्रामस्थांचा हिस्सा नसून संपूर्ण क्षेत्र वन विभागाचे अखत्यारीतील आहे. तसेच वनक्षेत्रावर वनवासी व वनग्राम लोकांचा अधिकार नाही. तसेच संबधित क्षेत्रावर वन आधिकार अधिनियम २००६ अंतर्गत वनदावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाही. त्यामुळे सदर जमीनीचा वापर नियोजीत राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात यावा असे सर्वानुमते ठराव समंत करून इकडेस सादर केलेला आहे (सोबत ठराव नक्कल सदर केली आहे)

(३) उपविभागीय अधिकारी यांचे अध्येक्षतेखाली वनहक्क समितीची बैठक दि.२९-०९-२०२० रोजी संपन्न झाली. त्यावेळी संबधित आधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. (सोबत सभेचे इतिवृत्त सादर,केले आहे). उपविभागीय अधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच महसुल विभगाकडे मागणी केलेल्या मौजे सोनारी व रामपूरा ता. जामनेर कंपाट्मेंट क्र. ४८३ पैकी १.०५२ हेक्टर व ४८७ पैकी ५.२४३ हेक्टर असे एकूण ६.२९५ हेक्टर वर वनदावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाही याची खातर जमा करून घेतली. यावरून उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव खालीलप्रमाणे अभिप्राय सादर करीत आहेत :-

(१) मौजे सोनारी व रामपूरा कंपाट्मेंट क्र.४८३ पैकी १.०५२ हेक्टर व कंपाट्मेंट क्र.४८७ पैकी ५.२४३ हेक्टर असे एकूण ६.२९५ हेक्टर वनक्षेत्रावर कोणतेही वनदावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाहीत. राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एल च्या प्रस्तावीत बांधकामासाठी वनहक्क कायद्यानुसार म. जिल्हाधिकारी हे सक्षम अधिकारी असून वनहक्क कायद्यानुसार आवश्यक प्रमाणपत्र देणेस शिफारस करणेत येत आहे. (सोबत प्रमाणपत्र सादर केले आहे).

(२) मौजे सोनारी व रामपूरा कंपाट्मेंट क्र.४८३ पैकी १.०५२ हेक्टर व कंपाट्मेंट क्र. ४८७ पैकी ५.२४३ हेक्टर येणेप्रमाणे ६.२९५ हेक्टर जमीन या किमान क्षेत्राची मागणी उपवनसंरक्षक जळगाव व कार्यकारी अभियंता म.रा. र.वि. महामंड्ळ (लि.) शिबीर कार्यालय नाशिक यांनी खात्री करून प्रमाणीत केली आहे. त्यवरून जिल्हाधिकारी जळगाव हे Minimum Demand Area प्रमाणपत्र प्रदान करणेस सक्षम आधिकारी असून त्याप्रमाणे Minimum Demand Area प्रमाणपत्र प्रदान करणेस शिफारस करीत आहे. (सोबत प्रमाणपत्र सादर केले आहे).

सबब माहितीसाठी सविनय सादर.

(प्रसाद मते)
भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
जळगांव भाग जळगांव

सोबत :-

(1) ग्रामपंचायत सोनारी व रामपूरा ता. जामनेर यांचेकडील ठरावाची नक्कल.
(2) उपविभागीय वना समितीच्या दि.२९-०९-२०२० च्या बैठकीचे इतिवृत्त.
(3) वन हक्क कयदा ६ (३) नुसार प्रमाणपत्र - १ तीन प्रतीत.
(4) Minimum Demand Area प्रमाणपत्र - १ तीन प्रतीत.

157

Form - I

(For plantation on non forest land and notificied as (protected forest) on or after 13 th December 1930 and locted in villages having no recorded scheduled Tribe Population as per 2001 and 2011 census)

**[Rule 6(3) (e) of forest (Conservation Rules 2003) as amended up to date]**

Government of Maharashtra
Office of District Collector Jalgaon
No. 90 Dated 13 Oct. 2020

**TO WHOMSOEVER IT, MAY CONCERN**

In Compliance of the Rule 6 (3) (e) of the forest (Conservation Rules 2003) as Amendment Rules 2014 ; Forest (Conservation) Second Amendment Rules; and Forest (Conservation) Amendment Rules 2016 ] it is certified that 6.925 hectares of forest land proposed to be diverted in favour of RO Mumbai Ministry of Road Transport and Highways. Government of India for Rehabilitation and Up-gradation of Pahur-Jamner- Bodwad-Muktainagar-Barhanpur Road NH-753L from existing chainage Km. 0/0 to km 45/00 and design ch Km. 0.00 to 44.760 Pkg-I to two lane with paved shoulders on EPC mode in the state of Maharashtra (purpose for diversion of forest land) in the district falls within the jurisdication of Jalgaon District village Rampura and Sonari Tal Jamner tehsils having no recorded population of Scheduled Tribes as per Census of India 2001 and 2011. It is further certified that :

a) The Protected Forest (s) namely Rampura and Sonari Tehasil Jamner Jalgaon District involved in the above villages are plantations raised on non-forest land on or after 13th December 1930 and were notified as PF vide notification no (s) ---------- dated ----------------.

b) There fore these PFs neither have residing Scheduled Tribes nor have Other Traditional Forest Dwellers (residing in the PFs for more than 75 years) having rights recognized under Forest Rights Act, 2006.

Encl: As above

Prasad Mate
(Land Acquistion)
Sub Divisional Officer
Jalgaon Division Jalgaon

FORM - II

(For linear projects other than plantation)

**[Rule 6 (3) (e) of Forest (Conservation) Rules 2003 as amended up to date]**

Government of Maharashtra
Office of District Collector Jalgaon
No. 90 Dated 13 Oct. 2020

**TO WHOMSOEVER IT, MAY CONCERN**

In compliance of the Rule 6 (3) (e) of the Forest (Conservation) Rules, 2003 [as amended vide the Forest (Conservation) Amendment Rules 2014; Forest (Conservation) second Amendment Rules 2014; and Forest (Conservation) Amendment Rules2016] it is certified that 6.295 hectares of forest land proposed to be diverted in favour of RO Mumbai Ministry of Road Transport and Highways. Government of India (name of user agency ) for Rehabilitation and Up-gradation of Pahur-Jamner- Bodwad-Muktainagar-Barhanpur Road NH-753L from existing chainage Km. 0/0 to km 45/00 and design ch Km. 0.00 to 44.760 Pkg-I to two lane with paved shoulders on EPC mode in the state of Maharashtra (purpose for diversion of forest land) in the district falls within the jurisdiction of Jalgaon District village (s) Rampura and Sonari in Jamner tehsils. It is further certified that:

(a) The complete process for identification and settlement of rights under the FRA has been carried out for the entire 6.925 hectares of forest land proposed for diversion. A copy of records of all consultations and meetings of the Forest Rights Committee(s), Gram Sabha(s), Sub-Division Level Committee(s) and the District Level Committee are enclosed as attachment ............ to attachment ...........

(b) The diversion of forest land for facilities managed by the Government as required under section 3 (2) of the FRA, 2006 have been completed and the Gram Sabhas have given their consent to it;

(c) The proposed area does not involve recognized right of Primitive Tribal Groups and Pre-Agricultural Committies.

Encl: As above

Prasad Mate
(Land Acquistion)
Sub Divisional Officer
Jalgaon Division Jalgaon

# MINIMUM DEMAND OF FOREST AREA

(Certificate of Collector)

Certified that all other alternatives for the purpose have been explored and the demand for the required forest land for " Pahur – Jamer – Bodwad- Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L " Tal. Jamner Dist. Jalgaon is the barest minimum demand.

The demand made by the Executive Engineer, M.S.R.D.C (Ltd) Mumbai Camp office Nashik for the below mentioned forestland from Jamner Taluka of Jalgaon District is the minimum for "Pahur – Jamer – Bodwad- Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L" Tal. Jamner Dist. Jalgaon

Area statement of the forestland required for "Pahur – Jamer – Bodwad- Muktainager- Barhanpur road Section I km 0+00 to 44+760 N.K753 L" Tal. Jamner Dist. Jalgaon.

| Sr. No | Particular | Village | Compart ment. No | Length (m) | Width (m)av | Area in Sq. M | Area in Ha. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ch.km. 20.850 to 22.790 = 1.94 Km | Sonari & Rampura | 487 | 1940 | 2.70 | 5243 | 5.243 |
| 2 | Ch.km.22.790 to 23.300 = Km | Sonari & Rampura | 483 | 510 | 2.06 | 1052 | 1.052 |
| | **Total Forest land** | | | | | | **6.295** |

**Prasad Mate**
**(Land Acquistion)**
**Sub Divisional Officer,**
**Jalgaon Division Jalgaon**

# • प्रोसिडींग नक्कल •

आज दिनांक २६/०१/२०२० रोजी ग्रामपंचायत कार्यालय, **सोनारी** ता.जामनेर जि.जळगांव येथे ग्रामसभा मा.सरपंच सो., **सौ.इंदूबाई भिका पारधी** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

| विषय | ठराव क्र. | तपशिल |
|---|---|---|
| **पहुर–जामनेर–बोदवड राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३, टप्पा क्र.१ रूंदीकरण, मजबुतीकरण करणेबाबत...** | | आजरोजी सुरू असलेल्या ग्रामसभेमध्ये सदरच्या विषयावर चर्चा करण्यात आली असता, पहुर–जामनेर–बोदवड राष्ट्रीय महामार्गावर कोणत्याही ग्रामस्थांचा हिस्सा नसुन ते क्षेत्र पूर्णतः वनविभागाचा आहे. तसेच वनक्षेत्रावर वनवासी व वनग्राम लोकांचा कोणताही अधिकार नाही. तसेच या राष्ट्रीय महामार्गावर येणाऱ्या क्षेत्रावर वन अधिकार अधिनियम २००६ अंतर्गत दावा दाखल नाही. त्यामुळे सदर जमीनीचा वापर नियोजित राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात यावा, असे आजच्या सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले व त्यास आजची सभा मंजूरी देत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर.<br><br>* सुचक :– हमिद अन्वर कंजर<br><br>* अनुमोदक :– किशोर श्रीराम पाटील<br><br>ठराव सर्वानुमते मंजूर.<br>अस्सल ठराव नक्कल तयार.<br>दिनांक : 26/09/2020 |

Gram Sevak
Gram Panchayat Sonari
Tal.Jamner Dist.Jalgaon

IBP
Gram Panchayat Sonari
Tal.Jamner Dist.Jalgaon

# ग्रामपंचायत कार्यालय
## रामपूर
ता.जामनेर, जि.जळगांव

ठराव नक्कल प्रत दि.12/09/2020

ग्रामपंचायत रामपुर ता. जामनेर जि. जळगाव येथील ग्रामपंचायत ग्रामसभा दि. 12/09/2020 मा. सरपंच सौ. सखुबाई ममराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात सभा भरली. इतीवृत्त खालील प्रमाणे.

विषय क्र. 10 : पहुर-जामनेर-बोदवड रोड राष्ट्रीय महामार्ग क्र. 753 L ट्प्पा क्र. 5 रुंदीकरण मजबुतीकरण करणे बाबत.

ठराव क्र. 10 : आजच्या आपल्या सभेत, वरील प्रमाणे विषयाबाबत सभेत चर्चा करण्यात आली त्यानुसार पहुर-जामनेर-बोदवड महामार्गावर कोणत्याही ग्रामस्थांचा हिस्सा नसुन ते क्षेत्र पुर्णतः वनविभागाची आहे तसेच वनक्षेत्रावर वनवासी व वनग्राम लोकांचा अधिकार नाही तसेच या मार्गावर येणाऱ्या क्षेत्रावर वन अधिकार अधिनियम 2006 च्या अंतर्गत दावा दाखल नाही. त्यामुळे सदर जमिनीचा वापर नियोजीत राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले व त्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सुचक :- ममराज भिका चव्हाण

अनुमोदक :- नवलसिंग भानपत चव्हाण

(स्वाक्षरी)
ग्रामसेवक
ग्रामपंचायत रामपूर
ता.जामनेर, जि.जळगांव

S.M.C
सरपंच
ग्रामपंचायत रामपुर

(131)

# इतिवृत्त

शासकिय कामाचे प्रयोजनार्थ वनहक्क मान्यता अधि 2006 (**Forest Right Act २००६**) अंतर्गत नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत म. उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचे अध्यक्षतेखालील समितीची दि. 29/09/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता उपविभागीय कार्यालय जळगांव भाग जळगांव येथे आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

---

मौजे सोनारी व रामपुरा यातील कंपार्टमेंट नंबर 483 व 487 पैकी एकूण 6.295 हेक्टर एवढे क्षेत्र वन जमिन असुन सदर जमिन पहूर ते इच्छापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. 753 एल मध्ये संपादित होत आहे. सदर जमिनीबाबत शासकीय कामाचे प्रयोजनार्थ वनहक्क कायदा अधि. 2006 अंतर्गत नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) मुंबई शिबीर कार्यालय नाशिक यांनी मागणी केले नुसार मा. जिल्हाधिकारी जळगांव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमिन/2/वनका/42/85/67/2020 दि.31/08/2020 अन्वये अहवाल मागणीनुसार आज दि.29/09/2020 रोजी स. 11.00 वाजता आयोजित करण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी स्तरावरील समितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी / कार्यालयीन प्रतिनिधी उपस्थित होते.

1) श्री प्रसाद मते – भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
2) श्री सी. आर. कांबळे – सहाय्यक उपवनसंरक्षक वनविभाग जळगांव
3) श्री समाधान पाटील – वनक्षेत्रपाल जामनेर
4) श्री के. पी. गांगुर्डे – कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी
५) श्री के. पी. गांगुर्डे – कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी
६) श्री डी. जी. पवार - ऑथॉरिटी अभियंता ध्रुव कन्सलटन्सी सर्विसेस नवी मुंबई यांचे प्रतिनिधी
७) श्री प्रकाश पाटील – उपसरपंच ग्रा.पं. सोनारी
८) श्री ऋषिकेश चव्हाण – प्रशासक ग्रा.पं. रामपुरा ता. जामनेर
९) श्री. एन. डी. झोपलवाड – सहाय्यक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग यावल जि. जळगाव

म. उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मौजे पहूर-जामनेर-बोदवड-मुक्ताईनगर-इच्छापूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. 753 एल चे २ लेन पेव्हड

शोल्डरसह रुंदीकरण व सुधारणा करणेचे काम म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) मुंबई यांचे मार्फत प्रस्तावित आहे. त्या सदर रस्त्यावर सा.क्र.20/850 ते 23/300 या लांबीतील रस्ता वनहद्दीतून जात आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) मुंबई शिबीर कार्यालय नाशिक यांनी 6.295 हेक्टर वन जमीन वनेतर प्रयोजनार्थ मागणीचा प्रस्ताव उपवनसंरक्षक जळगांव विभाग जळगांव यांना दि. 30/09/2019 रोजी ऑनलाईन पद्धतीने सादर केला. तसेच लेखी दस्तऐवज सादर केले. त्यावरुन म. उपवनसंरक्षक जळगांव व कार्यकारी अभियंता म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) मुंबई यांनी दि. 20/07/2020 रोजी मागणी केलेल्या जमीनीची संयुक्त पाहणी केली त्यानुसार सोनारी व रामपुरा कंपार्टमेंट नं.483 पैकी 1.052 हेक्टर आणि सोनारी व रामपुरा कंपार्टमेंट नं. 487 पैकी 5.243 हेक्टर जमीन अशी एकूण 6.295 हेक्टर वन जमीन वनेतर प्रयोजनासाठी आवश्यक असल्याची खात्री केलेली आहे. तत्राप वनसंरक्षक अधिनियम 1980 व वनसंरक्षक नियम 2003 अंतर्गत म. जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडून वनहक्क दावे याबद्दल फॉरेस्ट अ‍ॅक्ट रूल नं. 6 (3) अन्वये प्रमाणपत्र व नाहरकत प्रामाणपत्र आवश्यक आहेत अशी माहिती श्री के. पी. गांगुर्डे उपअभियंता म.रा.र.वि.महामंड्ळ (लि.) नाशिक यांनी दिली. ॲथॉरिटी अभियंता ध्रुव कन्सलटन्सी सर्विसेस नवी मुंबई यांचे प्रतिनिधी श्री डी. जी. पवार यांनी सर्व नकाशे इ. कागदपत्रे उपलब्ध करून उपस्थितांना अवगत केले. त्यावर श्री सी. आर. कांबळे सहा. वनसंरक्षक जळगांव विभाग यांनी सांगितले की उपवनसंरक्षक जळगांव वनविभाग जळगांव यांनी राष्ट्रीय महामार्ग क्र.753 एल ला मौजे सोनारी व रामपुरा शिवारातील कंपार्टमेंट नं.483 पैकी 1.052 हेक्टर जमीन तसेच मौजे सोनारी रामपुरा शिवारातील कंपार्टमेंट नं.487 पैकी 5.243 हेक्टर जमीन येणेप्रमाणे 6.295 हेक्टर क्षेत्र वनजमिन ही वनेतर प्रयोजनासाठी आवश्यक असून वनविभागातील उपलब्ध रेकॉर्ड नुसार वन कायद्यानुसार कोणतेही दावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाहीत. तसेच वरील प्रमाणे वनजमीन वनेतर प्रयोजनासाठी वनविभागाची हरकत नाही. तसेच किमान मागणी क्षेत्रफळ 6.295 हेक्टर आवश्यक आहे याची खात्री वनविभागाकडून करण्यात आली आहे. श्री समाधान पाटील वनक्षेत्रपाल जामनेर यांनी सांगितले की मागणी केलेल्या जमीनीच्या ख़ुणा जागेवर असुन वृक्ष इ. वनसर्वेक्षण करण्यात आले आहे. मागणी केलेल्या क्षेत्रात वनदावे दाखल नाहीत व प्रलंबित नाहीत.

मौजे सोनारी येथील श्री प्रकाश दत्तू पाटील उपसरपंच यांनी ग्रामपंचायत मौजे सोनारी ता. जामनेर यांनी वरील प्रमाणे 6.295 हेक्टर क्षेत्रफळावर आदिवासी वन हक्क कायद्यानुसार दावे दाखल व प्रलंबित नसून संपुर्ण क्षेत्र हे वनविभागाचे अखत्यारीत असून वनविभागाने 6.295 हेक्टर जमीन वनेतर प्रयोजनार्थ म्हणजे राष्ट्रीय महामार्ग क्र.753 एल चे बांधकामासाठी देण्याबाबत ग्रा.पं. सोनारी ता. जामनेर यांची हरकत नाही असे सांगितले.

मौजे रामपुरा येथील श्री ऋषिकेश चव्हाण प्रशासक ग्रा.पं. रामपुरा ता. जामनेर व श्री दिलीप आत्माराम जाधव ग्रामसेवक ग्रा.पं. रामपुरा ता. जामनेर यांनी वरीलप्रमाणे 6.295 हेक्टर क्षेत्रफळ वन विभागाचे मालकीचे असून राष्ट्रीय महामार्ग क्र.753 एल चे बांधकामासाठी वनजमिन देण्यास ग्रा.पं. रामपुरा ता. जामनेर यांची हरकत नाही. तसेच या क्षेत्रावर वनहक्क कायद्यानुसार दावे दाखल नाहीत तसेच प्रलंबित नाहीत असे नमूद केले.

मौजे रामपुरा व सोनारी येथील श्री एन बी झंपलवाड,आदिवासी विभाग सहाय्यक प्रकल्प अधिकारी, यावल यांनी वरीलप्रमाणे 6.295 हेक्टर क्षेत्रफळ वन विभागाचे मालकीचे असून राष्ट्रीय महामार्ग क्र.753 एल चे बांधकामासाठी वनजमिन देण्यास हरकत नाही. तसेच या क्षेत्रावर वनहक्क कायद्यानुसार कुठलेही दावे दाखल नाहीत तसेच प्रलंबित नाहीत असे नमूद केले.

मौजे सोनारी व रामपुरा ता. जामनेर येथील कंपार्टमेंट क्र.483 पैकी 1.057 हेक्टर व कंपार्टमेंट क्र.487 पैकी 5.243 हेक्टर अशा एकूण 6.295 हेक्टर वर रेकॉर्डनुसार महसुल विभागाकडे वनहक्क कायद्यानुसार कोणतेही दावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाहीत अशी उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांनी खातर जमा करून घेतली.

वरील प्रमाणे सर्व उपस्थित जबाबदार अधिकारी व पदाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेवून म. उपविभागीय अधिकारी जळगांव यांनी मौजे सोनारी व रामपुरा शिवारातील कंपार्टमेंट क्र.483 पैकी 1.052 हेक्टर वनक्षेत्र व कंपार्टमेंट क्र.487 पैकी 5.243 हेक्टर वनक्षेत्रात वनहक्क कायदा 2016 नुसार ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत हरकत नसून म. उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव हे म. जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी म्हणजे (1) Minimum demand area certificate (२) FRA वन हक्क कायद्यानुसार ना हरकत प्रमाणपत्र सादर करतील असे स्पष्ट करुन उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

(प्रसाद मते)
भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
जळगांव भाग जळगांव

स्थळ :- जळगांव
दिनांक :- 29/09/2020

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

आकाशवाणी केंद्राजवळ ता. जि. जळगाव, पिन कोड ४२५००१.

(महसूल शाखा)

दुरध्वनी क्र. ०२५७-२२२४१४१ फॅक्स क्र. ०२५७-२२२०५०० ई-मेल :- rev.jalgaon@gmail.com

क्र. जमीन/२/वनका/४२/८५/ १४२ /२०२० दिनांक ०१/१२/२०२०.

विषय :- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ आणि नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ च्या अमंलबजावणीबाबत कलम ३ (१) नुसार जिल्हास्तरीय वनहक्क समितीसमोर प्राप्त वनदाव्यांवर निर्णय घेण्यासाठी दि.२३/११/२०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ आणि नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ च्या अंमलबजावणीबाबत जिल्हास्तरीय वनहक्क समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे दि. २३/११/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर बैठकीचे विषय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | अमळनेर उपविभाग येथील ६१ वैयक्तिक वनदाव्यांबाबत निर्णय घेणे. |
| २ | चाळीसगाव उपविभाग येथील ०९ वैयक्तिक वनदाव्यांबाबत निर्णय घेणे. |
| ३ | फैजपुर उपविभाग येथील ३ सामुहिक वनदाव्यांबाबत निर्णय घेणे. |
| ४ | फैजपुर उपविभाग येथील ११८ वैयक्तिक वनदाव्यांबाबत निर्णय घेणे. |
| ५ | पहूर – जामनेर- बोदवड- ब-हाणपूर – इच्छापूर रस्त्याच्या कामासाठी वनविभागाच्या वनजमिनीकरीता वनहक्क कायद्यांतर्गतचे (FRA) प्रमाणपत्र व कमीत कमी क्षेत्र लागणार असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत |

सदर बैठकीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. जमीन/२/वनका/कावि/४२/८५/१३४/२०२०, दि. २१/११/२०२० अन्वये खालील सदस्यांना / अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले.

१. जिल्हाधिकारी जळगाव तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय वनहक्क समिती जळगाव. - अध्यक्ष
२. प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, यावल. - सदस्य सचिव
३. उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग जळगाव. - सदस्य
४. उपवनसंरक्षक, यावल वन विभाग जळगाव. - सदस्य
५. श्रीमती मोहीनी अनिल भिल, जिल्हा परिषद सदस्य. - सदस्य
६. श्रीमती वैशाली निवृत्ती तायडे, जिल्हा परिषद सदस्य. - सदस्य
७. श्रीमती सोनु राजु पवार, जिल्हा परिषद सदस्य. - सदस्य
८. निवासी उपजिल्हाधिकारी जळगाव. - निमंत्रित
९ .उपविभागीय अधिकारी अमळनेर भाग अमळनेर. - निमंत्रित

१०. उपविभागीय अधिकारी, फैजपुर भाग, फैजपुर. - निमंत्रित

११. उपविभागीय अधिकारी, चाळीसगाव भाग, चाळीसगाव. - निमंत्रित

**सदर सभेस खालील अधिकारी / सदस्य उपस्थित होते.**

१. जिल्हाधिकारी जळगाव.

२. निवासी उपजिल्हाधिकारी जळगाव.

३. प्रकल्प अधिकारी ,एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यावल.

४. उप वनसंरक्षक, यावल वन विभाग जळगाव.

५. उप वनसंरक्षक, जळगाव वन विभाग जळगाव.

६. श्रीमती वैशाली निवृत्ती तायडे, जिल्हा परिषद सदस्य.

७. उपविभागीय अधिकारी, फैजपुर भाग फैजपुर.

मा. निवासी उपजिल्हाधिकारी जळगाव यांनी सर्व उपस्थितांना बैठकीबाबत माहिती दिली व खालीलप्रमाणे विषयनिहाय बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

**विषय क्र. १ :- अमळनेर उपविभाग येथील ६१ वैयक्तिक वनदाव्यांबाबत निर्णय घेणे.**
**( यातच विषय क्र. २ ते ४ चा समावेश झाला आहे. )**

उपविभागीय अधिकारी अमळनेर भाग अमळनेर यांचेकडील चोपडा तालुक्यातील ६१ वैयक्तिक वनदावे जिल्हास्तरीय वनहक्क समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदर वनदाव्यांबाबत उपवन संरक्षक , यावल वनविभाग, जळगांव यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यानुसार दावानिहाय त्यांच्याकडील सविस्तर अभिप्राय स्वतंत्र विवरणपत्रात सादर केलेले आहे. सदर अभिप्रायानुसार ६१ दाव्यांपैकी ७ वनदावे पात्र करण्यास हरकत नाही असे नमूद केले. त्यानुसार समिती पुढे सादर केलेल्या दाव्यांच्या यादीतील अ.क्र.९, १०, १४, २४, ४४, ४९, ६१ या दाव्यांना सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प , यावल व उप वन संरक्षक, यावल वनविभाग, जळगांव यांनी जिल्हास्तरीय समितीकडेस मान्यतेसाठी सादर केलेल्या वैयक्तिक व सामुहिक वनदाव्यांच्या विवरणपत्रात उपविभागीय अधिकारी यांच्या अभिप्रायाच्या रकान्यानंतर वनविभागाचा अभिप्रायाचा रकाना समाविष्ट करुन सदर रकान्यात वनविभागाचे अभिप्राय नमूद करण्यात येवून समिती पुढेस मान्यतेसाठी सादर करावेत असे अभिप्राय नमुद केले. त्यानुसार अमळनेर उपविभागातील ५४ , चाळीसगांव उपविभागातील ९ , व फैजपूर उपविभागातील ११८ असे एकूण १८१ वैयक्तिक वनदावे आणि फैजपूर उपविभागातील ३ सामुहिक वनदावे समितीच्या पुढील बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

**विषय क्र. ५ :- पहूर – जामनेर- बोदवड- बऱ्हाणपूर – इच्छापूर रस्त्याच्या कामासाठी वनविभागाच्या वनजमिनीकरीता वनहक्क कायद्यांतर्गतचे (FRA) प्रमाणपत्र व कमीत कमी क्षेत्र लागणार असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत .**

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, (MSRDC) मुंबई, कॅम्प नाशिक यांचेकडील पत्र क्र. MSRDC/NSK/NH/९९६/२०२० Dt. १२/०८/२०२० नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ नुसार जामनेर तालुक्यातील मौजे सोनारी व रामपुरा शिवारातील कंपार्टमेट नं ४८३ पैकी १.०५ हे.आर. व कंपार्टमेट नं ४८७ पैकी ५.२४३ हे.आर असे एकूण ६.२९५ हे.आर वनजमिन वनेतर प्रयोजनासाठी (पहूर- जामनेर- बोदवड- मुक्ताईनगर- इच्छापूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र ७५३ एल) प्रस्तावाकरीता (१) कमीत कमी क्षेत्र लागणार असल्याचे प्रमाणपत्र (Minimum Demand Area) ,(२) वनहक्क कायद्यांतर्गतचे (FRA) प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.सदर प्रस्तावाबाबत उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचेकडील अभिप्राय या कार्यालयाचे पत्र दि. ३१/०८/२०२० नुसार मागविण्यात आले होते.

उपविभागीय अधिकारी जळगांव भाग यांचेकडील पत्र दि. १२/१०/२०२० नुसार अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर अहवालानुसार मौजे सोनारी व रामपुरा ता. जामनेर येथील ग्रामस्तरीय वनहक्क समितीच्या ठरावानुसार नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच उपविभागीय स्तरीय वनहक्क समितीचे दि. २९/०९/२०२० रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असल्याबाबतचे बैठकीचे इतिवृत्त सादर केलेले आहे. उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचे अहवालानुसार मौजे सोनारी व रामपुरा शिवारातील प्रस्तुत वनजमिनीबाबत वनदावे दाखल नाहीत किंवा प्रलंबित नाहीत याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

वरील विवेचनानुसार पहूर- जामनेर- बोदवड- मुक्ताईनगर- इच्छापूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र ७५३ एल या कामासाठी आवश्यक असलेली मौजे सोनारी व रामपुरा शिवारातील कंपार्टमेट नं ४८३ व ४८७ यातील ६.२९५ हे.आर वनजमिन वनेतर प्रयोजनासाठी वापरासाठी वनहक्क कायद्यांतर्गत (FRA) प्रमाणपत्र व कमीत कमी क्षेत्र (Minimum Demand Area) प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास जिल्हास्तरीय वनहक्क समितीने सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

मा. अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन व सभेचे कामकाम संपल्याचे जाहीर केले..

स्वाक्षरीत/-
(अभिजीत राऊत)
जिल्हाधिकारी जळगाव

**प्रत** :- सर्व संबधितांना महिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(पंकज लोखंडे)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव